महाराष्ट्र शासन

क्रमांक:एसटीसी २२८६/३१३/अमरावती-एक/
८६ मार्ग-४
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जुलै,१९८६.

प्रति,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ,अमरावती.

विषय :- १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून
१] श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे शिक्षण प्रसारक मंडळ, अकोट,जिल्हा अकोला.
२] जिजाऊ शिक्षण समिती,यवतमाळ यासंस्थांना अध्यापक महाविद्यालय[बी.एड.कॉलेज] विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासंबंधी.

महोदय,

कृपया,संदर्भाकरिता आपणांकडील क्रमांक:एसएण्ड/रिकॉग/२३१६ [१९८६] दिनांक २५.२.१९८६ चे वरील विषयाचे पत्र पहावे.

२. संबंधित संस्थांना १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अध्यापक महाविद्यालय [बी.एड.कॉलेज] सुरु करण्यास शासकीय संमती घोषित करण्यात येत आहे.

३. अमरावती विद्यापीठ अधिनियम १९८४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये करावयाची कार्यवाही अमरावती विद्यापीठाने करावी अशी विनंती आहे.

४. वरील संमती ही पुढील अटी/शर्तीवर देण्यात येत आहे :-

१] वरील संमती ही प्रथम १९८६-८७ या वर्षाकरिता मर्यादित आहे. या प्रस्तावाच्या संबंधात संलग्नीकरणाबाबत अमरावती विद्यापीठाकडून रीतसर प्रस्ताव आल्यावर त्या संदर्भात आदेश निर्गमित करण्यात येतील.

२] संबंधित महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाच्या संदर्भात अमरावती विद्यापीठ ज्या अटी व शर्ती विहित करील,त्याची पूर्तता करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

३] शासनाकडून प्रस्तावित अध्यापक महाविद्यालयाला कोणत्या प्रकारचे अनुदान देय राहणार नाही.

४] या अभ्यासक्रमास अमरावती विद्यापीठ ज्या अटी/शर्तीवर प्रवेश देण्यास संमती देईल त्यास अनुसरुन प्रवेश देणे संबंधित संस्थेवर बंधनकारक आहे.

कृ.मा.पहा..२

(२)



५] या महाविद्यालयाप्रित्यर्थ जमा होणारी रक्कम व खर्च होणारी रक्कम यांचे हिशेब, तपासणीसाकडून वेळोवेळी तपासून घेणे बंधनकारक आहे. जेव्हा जेव्हा शासकीय अधिकारी अगर विद्यापीठाचे अधिकारी सदर हिशेब व संबंधित कागदपत्रे निरिक्षणासाठी मागतील त्या त्या वेळी सदर हिशेब व कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

५. अमरावती विद्यापीठाने १९८६-८७ या शैक्षणिक वर्षी ८० प्रवेशक्षमता असलेला बी.एड.अभ्यासक्रमाचा एक वर्ग सुरु करण्यास प्रथम तात्पुरत्या स्वरुपाची संमती द्यावी अशी विनंती आहे. सदर संमती ही संलग्नीकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ना.म.धारप

[ ना. म. धारप ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
३] शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
४] विभागीय प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती, अकोला, यवतमाळ.
५] सचिव, श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोट, जिल्हा अकोला.
६] सचिव, जिजाऊ शिक्षण समिती, यवतमाळ.

यांना कळविण्यात येते की, महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद ३.४.५ मधील अटींवरच देण्यात आली आहे.

७] शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ/अकोला.
८] शिक्षण व सेवायोजन विभाग [विशि-२]
९] निवड नस्ती/माशि-४.

Savitribai Phule College of Education ★ AKOT ★

केळुसकर/१७.७.८६.

Principal
Savitribai Phule College of Education, Akot Dist. Akola